ePaper

## जी 20 परिषदेत दाखल होताच मुख्यमंत्री शिंदेकडून पंतप्रधानांचं कौतुक



| वर्ष - 7 । अंक - 128 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- पाकिस्तान विरोधात जबरदस्त प्लॅन!
- सोनारीकावर गुन्हा दाखल !
- कर्नाटकात भाजप-जेडीएस युती नाही!
- सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या!


www.mahaenews.com । रविवार, दिनांक 10 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# एकच मिशन... मराठा आरक्षण!

## » पिंपरी-चिंचवडमध्ये बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद; मोर्चात विविध पक्ष संघटनांचा सहभाग

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**जालना येथे झालेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ सकल मराठा समाज व पिंपरी चिंचवड शहर मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने शनिवारी (ता. ९) पिंपरी चिंचवड शहरात 'बंद'ची हाक देण्यात आली. त्याला शहरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला. 'बंद'च्या पार्श्वभूमीवर मोर्चाचे आयोजनही करण्यात आले होते. पिंपरी गाव येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून सुरू झालेल्या मोर्चाचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे झाला. या मोर्चामध्ये शहरातील विविध पक्ष व संघटनांनी सहभागी घेतला होता.**

दुकाने बंद, काही शाळा सुरू अत्यावश्यक सेवा वगळता शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने, हॉटेल बंद ठेवली होती. शनिवारी बहुतांश शाळांना सुटी असल्याने विद्यार्थी वाहतुकीचे प्रमाण कमी दिसले. सुरु असलेल्या शाळांमध्येही विद्यार्थ्यांची हजेरी कमी होती. अनेक खासगी कंपन्यांना शनिवारची सुटी असल्याने नागरिकांनी घरी राहणेच पसंत केले. बहुतांश रिक्षा चालकांनी रिक्षा वाहतूक बंद ठेवली. या बंद दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी शहरात ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आला होता.मोर्चा व धरणे आंदोलन 'बंद' दरम्यान मराठा मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. पिंपरी गाव येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून सुरू झालेल्या मोर्चाचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे झाला. या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर धरणे आंदोलनात झाले.

मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष प्रकाश जाधव यांनी मराठा समाजाच्या विविध मागण्या मांडल्या. यावेळी मराठा समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. तसेच विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या प्रतिनिधींनी आपल्या भाषणातून जालना येथील घटनेचा निषेध केला व मराठा समाजाच्या आरक्षणाला पाठिंबाही दर्शविला. यावेळी उपस्थितांनी जोरदार घोषणाबाजी केली. सायंकाळी पाचपर्यंत आंदोलकांकडून या ठिकाणी धरणे आंदोलन करण्यात आले.

### आरक्षण द्या नाहीतर राजीनामा द्या

मोर्चाच्या समारोपादरम्यान भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी उपस्थिती लावली. आंदोलनातील समन्वयकांची भाषणे झाल्यानंतर भाषणासाठी लांडगे यांनी ध्वनिक्षेपक हातात घेतल्यानंतर आंदोलकांच्या गर्दीतून घोषणाबाजी करण्यात आली. 'आरक्षण द्या नाहीतर राजीनामा द्या' अशाही घोषणा काही जणांनी दिल्या. यावेळी आमदार महेश लांडगे म्हणाले, "मी येथे नेता म्हणून आलेलो नाही तर एक मराठा समाजाचा भाग म्हणून आलेलो आहे. यापूर्वी झालेल्या मराठा मोर्चातही आम्ही सहभागी झालेलो होतो. त्यावेळी सभागृहामध्ये मराठा आरक्षणासंदर्भात भूमिका मांडणारे आम्ही सगळे मराठा आमदार होतो. आजसुद्धा मी खात्रीपूर्वक सांगतो मराठा समाजाच्या आरक्षणासाठी जे जे करावे लागेल ते ते करण्याच्या आमचा प्रयत्न राहील. कुठल्याही परिस्थितीत आम्ही तुमच्या सोबत आहोत."




### सतीश काळेंचे उपोषण सुरुच

**» जालन्यातील अंतरवाली सराटी येथील मनोज जरांगे पाटील यांच्या बेमुदत उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज पिंपरी चिंचवड यांच्यावतीने सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली १५ जणांनी गुरुवार (ता. ७) पासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे. हे उपोषण जरांगे पाटील यांचे उपोषण सुरु असेपर्यंत सुरुच राहणार असल्याची घोषणा काळे यांनी आज शनिवारी (ता. ९) केली.**

# अजित दादांनी टोचले शिक्षकांचे कान!

## 6 वाजेपासून मरमर करतो...तरी निकाल शून्यच

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिष्यवृत्तीच्या परिक्षेत बारामतीच्या विद्यार्थ्यांचा निकाल शून्य टक्के लागल्यामुळे त्यांनी आज संतप्त प्रतिक्रिया दिली. तर शिक्षकांचे चांगलेच कान टोचले. त्यांच्या खुमासदार शैलीत त्यांनी आज मी काय डोकं फोडून घेऊन का, एवढी मरमर करतो, तरी देखील बारामतीतील विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीतील निकाल शून्य लादल्याने शिक्षकांचे कान टोचले आहेत.**

अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही येथे जिल्ह्यासाठी व राज्यासाठी मरमर काम करतो. आता काय कपाळ फोडून घेऊ का? एवढं सगळं करुनही बारामतीचा निकाल शून्यच आहे. आज अल्पबचत भवन येथे आयोजित जिल्हा शिक्षक पुरस्कार आणि अध्यक्ष चषक पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी त्यांनी शिक्षकांची कानउघाडणीच केली.



### काही शाळांचा निकाल चांगला पण..

अजित पवार पुढे म्हणाले की, आपल्या मुलांना कुठे शिकवायचं हा प्रत्येक पालकाचा अधिकार आहे. त्यामुळे त्यात जाण्यात काही अर्थ नाही. आज गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून अनेक गोष्टी घडत आहेत. पहिलीपासून इंग्रजी सुरू झालं. या अगोदर पाचवीपासून होतं. कालानुरूप बदल केला जातो. बदल करण्याची प्रक्रिया सुरू असते. शिष्यवृत्तीमध्ये अनेक शाळाचा चांगला निकाल लागला आहे, तर काही शून्य लागला आहे. शिक्षण देण्यासाठी हवं ते दिलं जाईल. मात्र शिक्षण नीट द्या, अशा शब्दांत त्यांनी शिक्षकांना सल्ला दिला आहे. लातूर पॅटर्न शिक्षकांमुळे प्रसिद्ध असल्याचंही ते म्हणाले.

अजित पवार पुढे म्हणाले की, आपल्या मुलांना कुठे शिकवायचं हा प्रत्येक पालकाचा अधिकार आहे. त्यामुळे त्यात जाण्यात काही अर्थ नाही. आज गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून अनेक गोष्टी घडत आहेत. पहिलीपासून इंग्रजी सुरू झालं. या अगोदर पाचवीपासून होतं. कालानुरूप बदल केला जातो. बदल करण्याची प्रक्रिया सुरू असते.

शिष्यवृत्तीमध्ये अनेक शाळाचा चांगला निकाल लागला आहे, तर काही शून्य लागला आहे. शिक्षण देण्यासाठी हवं ते दिलं जाईल. मात्र शिक्षण नीट द्या, अशा शब्दांत त्यांनी शिक्षकांना सल्ला दिला आहे. लातूर पॅटर्न शिक्षकांमुळे प्रसिद्ध असल्याचंही ते म्हणाले.

पाचवीचा शिष्यवृत्तीचा निकाल लागला आहे. या परीक्षेत 640 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात शिरूरची मुले जास्त आहेत. त्यानंतर खेडची मुलं आहेत आणि त्यानंतर सातव्या क्रमांकावर बारामती आहे.

पुरंदर तालुक्यातील एका मुलाने अब्रू राखली आहे. शिरुरच्या पोरांनी बाजी मारली आहे. मात्र बारामती, भोर आणि हवेलीचा निकाल शून्य टक्के आहे. आता काय कपाळ फोडून घेऊ का? आम्ही सकाळी सहा वाजल्यापासून मरमर काम करतो आणि बारामतीचा निकाल शून्य, असं म्हणत ते शिक्षकांवरच भडकले.

# पाण्यासाठी चौथे महायुद्ध होण्याची शक्यता!

## प्रत्येक थेंब महत्त्वाचा अन् तितकाच मौल्यवान : डॉ. संजय चहांदे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**वाढती लोकसंख्या, कमी होत जाणारे कृषीक्षेत्र आणि भूजलाचा बेसुमार उपसा, यामुळे देशातील उपलब्ध जलसाठ्यांवर विपरीत परिणाम होत आहेत. शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्याच्या मार्गात उपलब्ध जलसाठ्यांच्या नियमनाचे आव्हान असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र वॉटर रिर्सोस रेग्यूलेटरी अथॉराइजचे सेवानिवृत्त अध्यक्ष डॉ. संजय चहांदे यांनी केले.**

तसेच भविष्यात पाण्यावरून चौथे महायुद्ध होईल त्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे आणि तो मौल्यवान आहे, याविषयी सर्व समाजघटकांत जाणीवजागृती अत्यावश्यक आहे. यातूनच पाणी,अन्न आणि उर्जासुरक्षेचे ध्येय साध्य करता येईल असे ते म्हणाले. ओम एल आय चॅप्टर, पुणेच्या लॅम्ब्डा अल्फा इंटरनॅशनल (यूएसए) शी संलग्न सोसायटी फॉर लँड इकॉनॉमिक्स आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. ही राष्ट्रीय परिषद 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून अन्न, सौरऊर्जा व पर्यावरण सुरक्षा' ही मध्यवर्ती संकल्पनेवर होती. याप्रसंगी कुलगुरू डॉ.आर.एम.चिटणीस, आर्किटेक्ट अनिलकुमार हाटकर, कोलंबो येथील आंतरराष्ट्रीय जल व्यवस्थापन संस्थेचे डॉ.तुषार शाह,ओम एल आयचे उपमहाप्रबंधक प्रकाश पाटील, जे. जे. कॉलेजचे प्रा. राजीव मिश्र आणि स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड कामर्सच्या अधिष्ठाता प्रा. डॉ.अंजली साने आदी उपस्थित होते. डॉ. चहांदे म्हणाले, पाणी मानवी अस्तित्वासाठी इतके अनिवार्य आहे की आपल्या अंतराळ मोहिमांचे एक ध्येय पाण्याचा शोध ही आहे. पृथ्वीवर पाण्याचे साठे विपुल असले तरी मानवोपयोगी जलसाठा मर्यादित आहे. उपलब्ध जलसाठे, अनियमित पाऊसमान, वाढती लोकसंख्या, औद्योगीकरणासाठी पाण्याची वाढती मागणी, अनियंत्रित भूजल उपसा या आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी जलसाठ्यांवरील नियंत्रण आवश्यक आहे. राज्य शासनाचे धोरणही या आव्हानांचा सामना करण्यासाठी पूरक करण्यात आले आहे. शाश्वत विकासाचे ध्येय या धोरणामागे आहे. अनिलकुमार हटकर म्हणाले, मानव कल्याण, दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत विकासासाठी उद्योग क्षेत्रांमध्ये पाणी, भूजल पातळीचे संकट, ऊर्जा वापर आणि वातावरणात वाढलेली ऊर्जा व कमी झालेला हिवाळा ते टिकवून ठेवण्यासाठी त्याच्या अंमलबजावणी, सर्वोत्तम तंत्रज्ञानाच्या पद्धतीचा वापर याद्दष्टीने अत्यंत महत्वाची परिषद आहे. डॉ. चिटणीस म्हणाले, सृष्टीवरील 71 टक्के भाग पाण्याने व्यापलेला असून तीन टक्के पाणी पिण्यायोग्य आहे. भविष्यातील युद्ध हे पाण्यामुळे होणार आहे .त्यामुळे सर्वांनी शाश्वत विकासासाठी कार्य करावे. याचे गांभीर्य लक्षात ठेवून यूजीसी ने सर्व विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण विषय सक्तीचा केला आहे. देशातील पाच सर्वोच्च अधिकारी या कमिटीमध्ये आहे .तसेच पर्यावरण सुरक्षेसाठी संपूर्ण जनतेचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे.




### पुण्यात एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

ओम एल आय चॅप्टर, पुण्याच्या लॅम्ब्डा अल्फा इंटरनॅशनल (यूएसए) शी संलग्न सोसायटी फॉर लँड इकॉनॉमिक्स आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. ही राष्ट्रीय परिषद 'जलसंवर्धनाच्या माध्यमातून अन्न, सौरऊर्जा व पर्यावरण सुरक्षा' ही मध्यवर्ती संकल्पनेवर होती. याप्रसंगी कुलगुरू डॉ.आर.एम.चिटणीस, आर्किटेक्ट अनिलकुमार हाटकर, कोलंबो येथील आंतरराष्ट्रीय जल व्यवस्थापन संस्थेचे डॉ.तुषार शाह,ओम एल आयचे उपमहाप्रबंधक प्रकाश पाटील, जे. जे. कॉलेजचे प्रा. राजीव मिश्रा आणि स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड कामर्सच्या अधिष्ठाता प्रा.डॉ.अंजली साने आदी उपस्थित होते.

# पवित्र इंद्रायणी; पाणी रे पाणी...!




**पिंपरी :** गेल्या आठवडाभरातील धरण क्षेत्रात झालेल्या संततधार पावसामुळे पवित्र इंद्रायणी नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे इंद्रायणीमाईने हिरवा आणि पिवळा शालू परिधान केल्याप्रमाणे विहंगमय रुप धारण केले आहे. यावर्षीच्या पावसाळ्यातील हे पहिले दृष्य अत्यंत अल्हाददायक आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या युवकाध्यक्षपदी शेखर काटे यांची निवड!

### शहर कार्याध्यक्षपदी प्रसाद कोलते, प्रसन्ना डांगे, तुषार ताम्हाणे

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) कार्यकारिणीत जनतेत स्थान असणाऱ्या युवक नेतृत्वास सामावून घेण्याच्या दृष्टीकोनातून शहराच्या युवक अध्यक्ष पदी शेखर काटे तर कार्याध्यक्षपदी प्रसाद कोलते, प्रसन्ना डांगे, तुषार ताम्हाणे यांची आज (दि. ०९) नियुक्ती करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मागदर्शनाने आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शेखर काटे व सहकारी प्रसाद कोलते, प्रसन्ना डांगे, तुषार ताम्हाणे यांना निवडीचे पत्र दिले.**



> शहरात राष्ट्रवादी जोमाने वाढावी म्हणून मी कार्यरत राहणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे साहेब, युवा नेते पार्थदादा पवार आणि शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली विकासाचा रथ युवकांच्या माध्यमातून वेगाने वाटचाल करेल याची मला खात्री आहे. पक्षाने मला दिलेल्या संधीचे मी सोने करेन, असा विश्वास देतो.
>
> **- शेखर काटे,** युवक अध्यक्ष. राष्ट्रवादी.

पिंपरी-चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. तो अधिकाधिक मजबूत रहावा या दृष्टीकोनातून आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या युवक नेतृत्वांना कार्यकारिणीत सामावून घेण्यात येत आहे. त्याच भूमिकेतून शनिवार (दि. ०९) युवक अध्यक्षांसह तीन शहर कार्याध्यक्षांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब यांच्या हस्ते तसेच युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, महिला अध्यक्षा सौ.रूपालीताई चाकणकर यांच्या उपस्थितीत पुणे येथे झालेल्या एका कार्यक्रमात करण्यात आल्या आहेत. शेखर काटे हे शहरातील युवा नेतृत्व आहेत. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघासोबत येणाऱ्या महापालिका निवडणुका डोळ्यासमोर सक्षम आणि जनतेमध्ये स्थान असणाऱ्या नेतृत्वास राष्ट्रवादीकडून कार्यकारणीमध्ये स्थान देण्यात येत आहे.

यावेळी प्रदेश युवक उपाध्यक्ष विशाल वाकडकर, सरचिटणीस विशाल काळभोर, प्रतिक साळुंखे, प्रशांत सपकाळ, नगरसेविका उषा (माई) काटे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## मराठा क्रांती मोर्चाचे सतीश काळे यांची प्रकृती खालावली, 3 दिवसानंतर उपोषण सोडले

। पिंपरी ।महाईन्यूज ।

पिंपरीत गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेल्या मराठा क्रांती मोर्चाच्या सतीश काळे यांनी उपोषण सोडले आहे. काळे यांची प्रकृती खालावली होती. पोलीस प्रशासनाचे अधिकारी नाईकवाडे, मानव कांबळे, यांच्या हस्ते हे उपोषण सोडण्यात आले.

मराठा समाजास आरक्षण मिळावे आणि मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी पिंपरी चिंचवड शहर मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतिश काळे व सहकारी पिंपरीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे उपोषणास बसले आहेत. सतीश काळे हे गेल्या तीन दिवसपासून आमरण उपोषण करत आहेत. परंतु आज त्यांची तब्येत खालावली असून डॉक्टरांनी त्यांना ऍडमिट करण्यासाठी सांगितले होते. या ठिकाणी समन्वय समितीची सर्व टीम उपस्थित झाली



आहे. सर्वांच्या एक मताने निर्णय घेण्यात आला की, सतीश काळे यांनी उपोषण सोडावे. आपला एक एक कार्यकर्ता आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. उपोषण सोडल्यानंतर लगेच त्यांना वायसीएम हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात येणार आहे. वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार आमरण उपोषणकर्ते सतीश काळे यांची तब्येत खालावल्याने त्यांचे उपोषण सोडण्यात आले. याप्रसंगी प्रकाश जाधव, कैलास कदम, मारुती भापकर, सचिन चिखले, जीवन बोराडे, सागर तापकीर, नकुल भोईर, युवराज दाखले, गणेश सरकटे, केदरे सर, राजेंद्र नायर, राजेंद्र पाटील, रवी सोळंके, भावेश काच्या, शाम पाटील




# विक्रमानंतरचा आराम!

**अनेक क्षेत्रांतनं मराठी माणूस हळूहळू कसा नामशेष होतोय हे वास्तव मांडणारं '.. बजाव पुंगी' हे संपादकीय (२८ ऑगस्ट) प्रकाशित झालं आणि अनेकांच्या मराठी संयमाचा बांध फुटला. अंतराळ संशोधनातली 'इस्रो' ते बुद्धिबळ स्पर्धा ते जागतिक कंपन्यांत आता मराठी नावं औषधालासुद्धा कशी नाहीत, हे त्यात होतं. त्याला ताजा संदर्भ होता चंद्रयान मोहिमेचा आणि प्रज्ञानंदच्या बुद्धिबळ झेपेचा.**

अगदी खरं आहे हे.. आमच्यातसुद्धा आता मराठी टक्का आटायला लागलाय..", अशी त्यावर मंत्रालयातल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची प्रतिक्रिया. मराठी नेते, मराठी विद्यार्थी आणि एकूणच मराठी माणसं आता कोणत्याही स्पर्धात नसतात, असं त्याचं निरीक्षण. ते ऐकल्यावर प्रश्न पडला : अधिकाराची वाळू मराठी माणसाच्या हातून कधीपासून सुटायला लागली असेल..? अलीकडच्या वर्तमानात या गळतीचा शुभारंभ १९९९ साली सापडतो. माहिती तंत्रज्ञानाच्या नवनवलाईचा काळ तो! संगणकप्रेमी, संगणक-साक्षर चंद्राबाबू नायडू म्हणजे आधुनिक भारताचा तारणहारच मानले जात होते त्या वेळी. ते आंध्रचे. काय दबदबा होता त्यांचा त्या वेळी. महाराष्ट्राच्याच काय पण कोणत्याही केंद्रीय मंत्र्यापेक्षाही मोठा तोरा असायचा चंद्राबाबूंचा. वास्तविक राज्य म्हणून आंध्र प्रदेश



केवढं, महाराष्ट्र केवढा, मुंबईच्या समोर हैदराबाद ते केवढं! आणि तरीही चंद्राबाबू नायडू विमा क्षेत्राच्या नियामकाचं मुख्यालय मुंबईत होऊ न देता आपल्या हैदराबादेत घेऊन गेले. सार्वजनिक क्षेत्रांतल्या असोत वा खासगी, जवळपास सगळ्या विमा कंपन्यांची मुख्यालयं मुंबईत. आधुनिक विमा क्षेत्राचे जनक अण्णासाहेब चिरमुले महाराष्ट्रातले. अनेक वित्त कंपन्यांची, उद्योगांची मुख्यालयंही मुंबईत.

आणि विमा क्षेत्रासाठीचं 'इन्शुरन्स रेग्युलेटरी अ‍ॅथोरिटी ऑफ इंडिया' (IRDA) हे मुख्यालय मात्र हैदराबादेत. मराठी राजकारण्यांच्या डोळ्यादेखत चंद्राबाबू नायडू हे मुख्यालय आपल्या राज्यात घेऊन गेले. बजाव पुंगी' संपादकीयावर प्रतिक्रिया देताना एक ज्येष्ठ बँकर म्हणाले ते धक्कादायक आहे. "संपूर्ण स्टेट बँकेत डीजीएम (डेप्युटी जनरल मॅनेजर) या पदाच्या वर आज एकही मराठी माणूस नाही" असं अगदी निराश होऊन ते सांगत होते. एके काळी पी. जी. काकोडकर, वैद्य, मनोहर भिडे अशी एकापेक्षा एक आदरणीय मराठी व्यक्तिमत्त्वं स्टेट बँकेचं नेतृत्व करून गेली. आता परिस्थिती अशी की चीफ जनरल मॅनेजर तर सोडाच पण डेप्युटी जनरल मॅनेजरसारख्या पदावरही संपूर्ण स्टेट बँकेत एक मराठी माणूस नाही! पण ही शोकांतिका इथंच संपत नाही. आपल्या देशात सरकारी मालकीच्या डझनभर आणि खासगी साधारण २१ अशा बँका आहेत. बँक ऑफ बडोदा, महाराष्ट्र बँक, बँक ऑफ इंडिया वगैरे सरकारी. तर एचडीएफसी, आयसीआयसीआय, ॲक्सिस इत्यादी खासगी. यातल्या एकाही बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक वा अध्यक्षपदी मराठी नाव नाही. मनोहर भिडे हे अशा पदावरचं शेवटचं मराठी नाव. ते बँक ऑफ इंडियाच्या प्रमुखपदी होते. त्यांच्यानंतर एक मराठी माणूस या पदावर पोहोचलेला नाही. योगायोग असा की ते निवृत्त झाले तेही १९९९ साली. केंद्र सरकारच्या मालकीच्या जवळपास पावणेतीनशे कंपन्या आहेत आपल्याकडे. या सार्वजनिक मालकीच्या (पीएसयू) कंपन्यांत एके काळी मराठी टक्का चांगला असायचा. अनेक मराठी माणसं या केंद्र सरकारच्या कंपन्यांत विविध पदांवर राहून गेली. आजची परिस्थिती काय? 'इंडियन ऑइल' या बलाढ्य तेल कंपनीच्या प्रमुखपदी तेवढं श्रीकांत महादेव वैद्य असं एकमेव घसघशीत मराठी नाव दिसतं. बाकी सगळीकडे मराठी माणसाच्या नावे ठणठण गोपाळ! ही वगळता एकाही सरकारी कंपनीचं नेतृत्व मराठी माणसाकडे नाही. एके काळी टाटा समूहात सुमंत मुळगावकर, द. रा. पेंडसे, अजित केरकर अशी नावं दणदणीत महत्त्वाच्या पदांवर होती. सर्व उद्योगांत टाटांइतका मराठी उद्योग नाही. टाटांची सुरुवातच 'एम्प्रेस मिल'नं नागपुरात झाली. पण उगमभूमी मराठी असूनही टाटा समूहात उच्चपदावर आज एक मराठी माणूस नाही.

टाटांच्या 'एअर इंडिया'चं पहिलं विमान मुंबईतनं उडालं. आता ही विमान कंपनी पुन्हा टाटांकडे आली आणि तिचं मुंबईतलं मुख्यालयही दिल्लीला उडालं. नरिमन पॉइंट परिसरातली 'एअर इंडिया'ची टोलेजंग इमारत ही एके काळी या परिसराची ओळख होती. ती इतक्या सहजपणे आता पुसली गेली आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे मराठी राजकारण्यांनी ती पुसू दिली की ते पाहून त्या कंपनीला तरी का दोष द्यावा असा प्रश्न पडतो.

## संपादकीय »

# सणांचे सुतक!

***श्रीकृष्ण जन्माच्या आनंदाप्रीत्यर्थ दहीहंडीचा कार्यक्रम राज्यभर सरकारी आशीर्वादाने दणदणाटात साजरा झाला. समाज म्हणून कोणताही सण एकत्रितपणे साजरा करायचा असेल.***

श्रीकृष्ण जन्माच्या आनंदाप्रीत्यर्थ दहीहंडीचा कार्यक्रम राज्यभर सरकारी आशीर्वादाने दणदणाटात साजरा झाला. तो जेवढा झगमगाटी होता, तेवढाच उन्मादीही होता. दिवस मावळल्यानंतरही रस्त्यावरच साजऱ्या होणाऱ्या या कार्यक्रमामुळे वाहतुकीचा प्रचंड गोंधळ झाला, नोकरदारांना घरी परतणे दुरापास्त झाले, त्याहूनही अधिक त्रासदायक ठरले ते या उत्सवानिमित्त शहरभर उभारण्यात आलेल्या ध्वनिवर्धकांच्या भिंतींमधून येणारा अक्राळविक्राळ ध्वनी, त्याच्या बरोबरीने डोळ्यांना त्रास होईल, अशी विद्युत रोषणाई आणि या सगळ्याच्या जोडीला ढोल-ताशांचा कंठाळी आवाज.. दहीहंडीचा हा उत्सव साजरा करण्यासाठी मंडळामंडळांमधली जी स्पर्धा होती, ती कोण अधिक उच्छादी ठरतो, याची. भर पावसात गोविंदांचे थरच्या थर त्या हंडीपर्यंत पोहोचण्यातला थरार कुठच्या कुठे पळून जावा, अशी ही पार्श्वभूमी.

**सहा राज्यांमधील विधानसभेच्या सात जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये इंडिया आघाडीत सहभागी झालेल्या घटक पक्षांनी चार तर भाजपने तीन जागा जिंकल्या. गेल्याच आठवड्यात मुंबईत झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत आगामी लोकसभा निवडणूक जिंकण्याचा निर्धार करण्यात आला होता. त्यापाठोपाठ स्वतंत्रपणे लढूनही इंडिया आघाडीच्या घटक पक्षांना मिळालेल्या यशाने आघाडीच्या आशा नक्कीच पल्लवित होणार आहेत.**

# पोटनिवडणुकीच्या निकालांचा अर्थ

उत्तर प्रदेशातील घोशी मतदारसंघात समाजवादी पार्टी विरुद्ध भाजप म्हणजेच इंडिया विरुद्ध भाजप अशी सरळ लढत झाली होती. समाजवादी पार्टीने ही जागा कायम राखली. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पार्टीकडून विजयी झालेल्या आमदाराने पक्षांतर करून भाजपमध्ये प्रवेश केला व त्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. पक्षांतर केल्याने पोटनिवडणूक घेण्यास भाग पाडलेल्या आमदाराला मतदारांनी नाकारले व घरी बसविले. गेल्या वेळी समाजवादी पार्टीने ही जागा २२ हजार मतांनी जिंकली होती. पोटनिवडणुकीत समाजवादी पार्टीचा उमेदवार ४० हजारांपेक्षा अधिक मतांनी विजयी झाला. ८० जागा असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा जिंकण्याचे भाजपचे ध्येय आहे. २०१४ आणि २०१९ मध्ये उत्तर प्रदेशने भाजपच्या बाजूने कौल दिला होता. एका विधानसभा मतदारसंघातील



पोटनिवडणुकीच्या निकालावरून राजकीय चित्र बदलेल, असा दावा करता येणार नाही. पण काँग्रेसचा पाठिंबा, इंडिया आघाडीचा घटक पक्ष नसला तरी बसपाचा उमेदवार रिंगणात नसणे याचा पोटनिवडणुकीत समाजवादी पार्टीला चांगलाच फायदा झाला. लोकसभा निवडणुकीत एकास एक लढत झाल्यास उत्तर भारतातील चित्र बदलू शकते. यामुळेच मायावती यांच्या बसपाला महत्त्व येणार आहे. तिरंगी लढत व्हावी, असा भाजपचा प्रयत्न राहील. कारण तिरंगी लढतीशिवाय भाजपचे विजयाचे गणित जुळू शकणार नाही, असा पोटनिवडणुकीच्या निकालाचा अर्थ काढता येईल.

उत्तर प्रदेशपाठोपाठ पश्चिम बंगालमधील तृणमूलचा विजयही भाजपला चपराक समजली जाते. कारण ही जागा कायम राखण्यात भाजपला यश आले नाही. भाजप आमदाराच्या निधनामुळे झालेल्या पोटनिवडणुकीत पक्षाने कारगीलमध्ये शहीद झालेल्या सैनिकाच्या पत्नीला उमेदवारी देऊन सहानुभूतीचा लाभ उठविण्याचा प्रयत्न केला होता. पण तृणमूलने ही जागा ४३०९ मतांनी काबीज केली. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल, भाजप आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट अशी तिरंगी लढत झाली होती. इंडिया आघाडीत ममता व डावे पक्ष एकत्र असले तरी आगामी लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये आघाडीतील घटक पक्ष एकत्र लढणार नाहीत हे आधीच जाहीर करण्यात आले आहे. तरीही भाजपने गेल्या वेळी जिंकलेल्या मतदारसंघात तृणमूलला मिळालेला विजय हा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासाठी दिलासाजनक ठरावा.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या!

## हल्ला करणाऱ्याला रजेवर पाठवत नसतात : जरांगे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी जालन्याच्या आंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात गत 12 दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. 1 सप्टेंबर रोजी पोलिसांनी या आंदोलकांवर लाठीचार्ज केला. तेव्हापासून या आंदोलनाची धार चांगलीच वाढली आहे. जरांगेंनी शनिवारी माध्यमांशी संवाद साधताना लाठीमार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सरकारने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचा संताप व्यक्त केला.**






मनोज जरांगे पाटील आंदोलकांवरील लाठीचार्जविषयी म्हणाले की, आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले. आम्ही मार खाल्ला. आताही आमच्या माय माऊल्या आयसीयूमध्ये दाखल आहेत. त्यांच्या छातीत 13 छर्रे आहेत. गंभीर गुन्हे दाखल आहेत. सरकार गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन दिले. पण ही प्रक्रिया अद्याप सुरु झाली नाही. जे दोषी अधिकारी आहेत त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई तातडीने करायला हवी, पण सरकारने त्यांना सक्तीच्या रजेवर भजी खाण्यासाठी पाठवले. या प्रकरणी बडतर्फीची एकही कारवाई झाली नाही, असे जरांगे म्हणाले. सद्यस्थितीत ज्यांनी गोळ्या फायर केल्या, ते मुंबईला शिष्टमंडळासोबत फिरत आहेत. ज्यांच्या चौकशा व्हायला पाहिजे ते अधिकारी आपल्या समोर फिरत आहेत. सरकारने त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची ग्वाही दिली होती. पण आतापर्यंत एकही कारवाई झाली नाही. भ्याड अमानुष हल्ला करणाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठवत नसतात. त्यांना बडतर्फ करत असतात, असेही जरांगे पाटील यावेळी आपला संताप व्यक्त करत म्हणाले. तत्पूर्वी, जरांगे पाटील व सरकारमध्ये झालेली चर्चेची तिसरी फेरी निष्फळ ठरली. त्यामुळे जरांगेंनी आपले उपोषण अव्याहत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने 7 सप्टेंबर रोजी आरक्षणाचा जीआर काढला होता. पण आम्ही त्यातील वंशावळीचा मुद्दा वगळून मराठा समाजाला सरसकट कुणबी जातप्रमाणपत्र देण्याची मागणी केली होती. या प्रकरणी शुक्रवारी मुंबईत मिटींग झाली. त्यानंतर नवा जीआर काढण्यात आला. पण त्यात कोणतीही सुधारणा झाली नसल्यामुळे आम्ही उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले. 2004 चा मराठा कुणबी जीआर काम करत नव्हता. त्या जीआरचा 19 वर्षांत एकही उपयोग झाला नाही. त्यातही दुरुस्त्या अपेक्षित होत्या. पण त्या झाल्या नाही. या जीआरमध्ये तत्काळ तत्काळ दुरुस्ती करून मराठा समाजाला सरसकट कुणबी जातप्रमाणपत्र देण्यात यावे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### संपूर्ण महाराष्ट्राला फायदा द्या

मनपरिवर्तन करा, मतपरिवर्तन करा. कोणाच्याही विरोधात बोलू नका. आपण शांततेत आंदोलन करायचं, उग्र कोणीही करायचं नाही, ही महाराष्ट्रातील जनतेला कळकळीची विनंती आहे. मराठा समाजातील जनतेला हात जोडून विनंती आहे की मी जो हा लढा लढतोय, मी अखंड महाराष्ट्रासाठी आरक्षण द्यावं ही मागणी करतोय. समज-गैरसमज ठेवण्याचं कारण नाही. मराठवाड्यात फायदा द्या, महाराष्ट्रालाही फायदा द्या. सरकसकट महाराष्ट्रातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्या, किंवा २००४ जीआरमध्ये तातडीने दुरुस्ती करा आणि प्रमाणपत्र वाटप झाले पाहिजेत", असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. "आपल्या ठरल्याप्रमाणे सरकारने जीआर आणलं तर उद्या सकाळी सूर्य उगवण्याआधी पाणी पिणार, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. हे आमरण उपोषण सुरूच राहिल, महाराष्ट्रातील मराठ्यांसाठी हा लढा आहे. महाराष्ट्रातील मराठ्यांनी शांततेने आंदोलन करावं, माझ्या शब्दाच्या पुढे मराठा समाजाने जाऊ नये. मी तुमच्यापेक्षा मोठा नाही पण मुलगा म्हणून ऐका, कारण आरक्षण मिळवून देण्याची जबाबदारी आपण खांद्यावर घेतली आहे", असं आवाहनही जरांगे पाटलांनी केलं.

---

## अखिल चिंचवडगाव सार्वजनिक दहीहंडी उत्सव

# शितलादेवी गोविंदा पथकास मान!

## महोत्सवास श्री वरदहस्त' पारंपारिक ढोल ताशा पथकाच्या वादनाने सुरुवात

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील मानाची पारंपरिक दहिहंडी म्हणून ओळखली जाणारी माजी नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे मित्र परिवार आयोजित 'अखिल चिंचवडगाव सार्वजनिक दहिहंडी उत्सव समितीची दहिहंडी फोडण्याचा मान मुंबईच्या चेंबूर येथील 'शितलादेवी गोविंदा पथकास' मिळाला. या दहीहंडी महोत्सवाची सुरूवात चिंचवडगावातीलच 'श्री वरदहस्त' पारंपारिक ढोल ताशा पथकाच्या वादनाने झाली.**



पिंपरी चिंचवड मधील ताथवडे गावातील 'नृसिंह' गोविंदा पथक, मुंबई चेंबूर मधील 'शितळादेवी' गोविंदा पथक, मुंबई गोवंडी येथिल 'लुंबिनीबाग' गोविंदा पथक, चेंबूर सिद्धार्थनगर येथिल गोविंदा पथकाने चित्तथरारक कसरतीचे प्रदर्शन व स्पर्धा करीत सलामी देत प्रेक्षकांची मने जिंकली. शेवटी चेंबूरच्या 'शितलादेवी' गोविंदा पथकाने दहिहंडी फोडण्याचा मान मिळवला. दहिहंडी महोत्सवाचे संयोजक ॲड. मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने स्मृतीचिन्ह व 5,55,555 रुपयांचे बक्षीस आमदार उमाताई खापरे व भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते गोविंदा पथकास देण्यात आले. दरम्यान या दहिहंडी महोत्सवास आवर्जून उपस्थित असलेले चिंचवडचे सुपुत्र व 'शेर शिवराज आणि सुभेदार' या सुपरहिट चित्रपटांचे निर्माते प्रद्योत पेंढारकर, मावळचे खासदार श्रीरंगआप्पा बारणे, चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनीताई जगताप, भाजपा प्रदेश सचिव व शहर प्रभारी वर्षाताई डहाळे, भाजपा शहराध्यक्ष शंकरभाऊ जगताप, माजी विरोधी पक्षनेते नानासाहेब काटे, नाट्यपरिषदेचे अध्यक्ष व जेष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, चंद्रकांतआण्णा नखाते, नगरसेवक शत्रुघ्न उर्फ बापूसाहेब काटे, नामदेवजी ढाके, बाळासाहेब ओव्हाळ, संदिपआण्णा कस्पटे, हर्षल ढोरे, राज तापकीर यांचा यावेळी नगरसेवक ॲड. मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज भोईर यांनी केले. तसेच दहिहंडी महोत्सव यशस्वी व्हावा याकरिता स्वप्निल शेडगे, अजित कुलथे, धनंजय शाळिग्राम, राघूशेठ चिंचवडे, नंदूकाका भोगले, राजन पाटील, स्वप्निल देव, राजन चिंचवडे, अतुल कांबळे, अश्विन चिंचवडे, विशाल भदे, विजय शेट्टी, अक्षय तिकोणे यांनी प्रयत्न केले.

# कर्नाटकात भाजप-जेडीएस युती नाही!

## » कुमारस्वामींनी येडियुरप्पा यांचा दावा फेटाळला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी कर्नाटकमध्ये भाजप आणि जेडीएस अद्याप एकत्र आलेले नाहीत. शनिवारी माजी मुख्यमंत्री आणि जेडीएस नेते एचडी कुमारस्वामी यांनी भाजप नेते बीएस येडियुरप्पा यांच्यासोबतचे वक्तव्य फेटाळून लावले. ते म्हणाले- ही त्यांची वैयक्तिक प्रतिक्रिया आहे. आतापर्यंत दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावर कोणतीही चर्चा झालेली नाही. आम्ही दोन-तीन वेळा भेटलो, पण अजून निर्णय झालेला नाही.**

कुमारस्वामी यांनीही युतीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, आपण एकत्र येत आहोत की नाही ते नंतर पाहू. मात्र राज्यातील जनतेने आमच्यासोबत (दोन्ही पक्षांनी) एकत्र येण्याची गरज आहे कारण काँग्रेस राज्याची लूट करत आहे. त्यांना पर्याय हवा. 2006 मध्ये मी भाजपशी हातमिळवणी केली होती. माझ्या 20 महिन्यांच्या कामामुळे राज्यात चांगली प्रतिमा (सद्भावना) आहे.

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बीएस येडियुरप्पा यांनी 8 सप्टेंबर रोजी जेडीएस भाजपसोबत लोकसभा निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले होते. त्यांनी सांगितले होते की, गृहमंत्री अमित शाह जेडीएसला लोकसभेच्या 4 जागा देण्यास सहमत आहेत. मात्र, यापूर्वी जेडीएस कर्नाटकात 28 पैकी पाच जागांची मागणी करत होती. माजी पंतप्रधान आणि जेडीएस सुप्रीमो एचडी देवेगौडा यांनी अमित



शहा आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांची भेट घेतल्याचे त्यांनी सांगितले होते. ज्यामध्ये दोन्ही पक्षांनी एकत्र येण्याचे मान्य केले. जेडीएसला कर्नाटकातील मंड्या, हसन, बेंगळुरू (ग्रामीण) आणि चिकबल्लापूर या जागांवर निवडणूक लढवायची आहे. जेडीएसला कोणत्या जागा दिल्या जात आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. 2019 च्या निवडणुकीच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, जेडीएसला फक्त हसन जागा जिंकता आली. तर मंड्या, बंगळुरू (ग्रामीण) आणि चिकबल्लापूर या जागा भाजपने जिंकल्या होत्या. हसन यांच्या आधी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवन्ना या निवडणुकीत विजयी झाला, पण त्यांची उमेदवारी कर्नाटक उच्च न्यायालयाने 1 सप्टेंबर रोजी रद्द केली. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिली होती, असे न्यायालयाने म्हटले होते. त्याने आपले 24 कोटींहून अधिक उत्पन्न लपवले होते. 2019 च्या लोकसभा निवडणुका जिंकणारे प्रज्वल हे पक्षाचे एकमेव खासदार होते. हासन यांची खासदारकी रद्द केल्यानंतर जेडीएसकडे आता लोकसभेत एकही सदस्य नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत जेडीएसला 9.67% मते मिळाली होती. त्याच वेळी, जेडीएसने विधानसभा निवडणुकीत 19 जागा जिंकल्या होत्या आणि पक्षाला 13.29% मते मिळाली होती. भाजप आणि जेडीएस एकत्र आल्यास दक्षिण भारतातील या राज्यात सामाजिक आणि राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात. कर्नाटकातील 17 टक्के लोकसंख्येचा लिंगायत समाज हा भाजपचा मूळ मतदार मानला जातो. माजी मुख्यमंत्री बीएस येडियुरप्पा हे देखील लिंगायत समाजाचे आहेत. त्याच वेळी, लिंगायत नंतर, सुमारे 15 टक्के लोकसंख्या असलेला वोक्कलिगा समुदाय हा दुसऱ्या क्रमांकाचा प्रभावशाली समुदाय आहे.

### काँग्रेस राज्याची लूट करत आहे

» कुमारस्वामी यांनीही युतीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, आपण एकत्र येत आहोत की नाही ते नंतर पाहू. मात्र राज्यातील जनतेने आमच्यासोबत (दोन्ही पक्षांनी) एकत्र येण्याची गरज आहे कारण काँग्रेस राज्याची लूट करत आहे. त्यांना पर्याय हवा. 2006 मध्ये मी भाजपशी हातमिळवणी केली होती. माझ्या 20 महिन्यांच्या कामामुळे राज्यात चांगली प्रतिमा (सद्भावना) आहे.

# भारत-मध्य-पूर्व-युरोप मेगा आर्थिक कॉरिडॉर!

## » भारताच्या पुढाकाराने आफ्रिकन युनियन बनले G20 सदस्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नवी दिल्लीत सुरू असलेल्या G20 शिखर परिषदेच्या पहिल्याच दिवशी संयुक्त घोषणेवर सहमती झाली आहे. पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला अध्यक्ष या नात्याने ही माहिती दिली. त्यांनी सर्व सदस्य देशांच्या संमतीने नवी दिल्ली घोषणा पारित केली. शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात पंतप्रधानांनी आफ्रिकन युनियनला G20 चा स्थायी सदस्य बनवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. पीएम मोदींनी अध्यक्ष म्हणून ते मंजूर करताच आफ्रिकन युनियनचे प्रमुख अजली असोमानी यांनी जाऊन पंतप्रधान मोदींना मिठी मारली. भारताच्या प्रस्तावाला चीन आणि युरोपीय संघानेही पाठिंबा दिला होता.**

आफ्रिकेतील 55 देशांना संघाचे सदस्यत्व मिळाल्याचा फायदा होणार आहे. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात जगात विश्वासाचे संकट निर्माण झाले असल्याचे सांगितले. 21वे शतक जगाला नवी दिशा देणार आहे.पंतप्रधान मोदींनी ब्रिटनच्या पंतप्रधानांचे गळाभेट घेत स्वागत केले. त्याचवेळी बायडेन यांना भारत मंडपममध्ये बांधलेल्या कोणार्क चक्राची माहिती दिली. समिटची सुरुवात फोटो सेशनने झाली. यानंतर पंतप्रधान मोदी यांनी स्वागत भाषण केले.

जर्मनीचे चॅन्सलर ओलाफ स्कोल्झ आणि सौदीचे क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान हे शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आज सकाळी भारतात आले आहेत. दरम्यान, या परिषदेसाठी सदस्य देशांचे प्रमुख 8 सप्टेंबरलाच नवी दिल्लीत पोहोचले आहेत. यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन, ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचा समावेश आहे. जर्मनीचे चान्सलर ओलाफ स्कोल्झ आज



### हे प्रमुख आले नाहीत

» काही महत्त्वाच्या देशांचे राष्ट्रप्रमुख G20 च्या या अत्यंत महत्त्वाच्या शिखर परिषदेत सहभागी होत नाहीत. यामध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान (MBS) यांचा समावेश आहे. याशिवाय स्पेनचे सांचेझ देखील या शिखर परिषदेला उपस्थित राहू शकणार नाहीत. ते कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहेत.

सकाळी भारतात पोहोचले आहेत. त्याचवेळी, काल संध्याकाळी उशिरा भारतात आलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडन यांनी मोदींना भेटण्यासाठी विमानतळावरून थेट त्यांचे निवास्थान गाठले. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे 27 मिनिटे चर्चा झाली. आज समिट दरम्यान दोनदा फोटो सेशन होणार आहे. प्रथम, शिखराच्या अधिकृत उद्घाटनानंतर लगेच आणि संध्याकाळी डिनर दरम्यान. शुक्रवारी संध्याकाळी मोदींनी मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जुगनाथ आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांचीही भेट घेतली. भारत या वेळी अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करून दाखवू शकतो. भारत त्या यशाच्या अगदी उंबरठ्यावर आहे. इंडोनेशियातील बाली शिखर संमेलनात होऊ शकले नाही ती गोष्ट आता दृष्टिपथात आली आहे. गेल्या जी-२० संमेलनात रशिया-युक्रेन युद्धावरून सर्व सहमती दिसून येत नव्हती. तेव्हा रशिया व चीनने युद्धाबाबत होणाऱ्या कोणत्याही विधानांपासून स्वत:ला अलिप्त ठेवले होते.

परंतु सूत्रानुसार या वेळी युद्धाशी संबंधित दोन्ही पक्षांमध्ये सहमती दिसून येत आहे. त्यासाठी भारताने दोन्ही पक्षांना आपापल्या भूमिकांवरून एक पाऊल मागे येण्यासाठी राजी केले आहे. ब्रिटीश पंतप्रधान ऋषी सुनक आणि त्यांच्या पत्नी अक्षता मूर्ती यांचे केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे यांनी जय सियारामच्या जयघोषात स्वागत केले. तसेच ते म्हणाले- 'भारताचे जावई म्हणून आम्ही तुमचे स्वागत करतो.' यानंतर सुनक म्हणाले- मला अभिमान आहे की मी हिंदू आहे. शिखर परिषद सुरू होण्यापूर्वी G20 शेर्पा अमिताभ कांत म्हणाले- भारताला आव्हानात्मक काळात या संघटनेचे अध्यक्षपद मिळाले आहे. जग आर्थिक मंदीच्या काळातून जात आहे. कांत पुढे म्हणाले- भारताला वाटले की आपण 'वसुधैव कुटुंबकम' या थीमने सुरुवात केली पाहिजे - जग एक कुटुंब आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताचे अध्यक्षपद सर्वसमावेशक, निर्णायक आणि महत्त्वाकांक्षी असावे. आम्ही हे जगलो आहोत, असेही ते म्हणाले. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग आणि एचडी देवेगौडा यांनाही G20 शिखर परिषदेच्या डिनरसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. देवेगौडा यांनी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास नकार दिला.भारतात येण्यापूर्वी स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेड्रो सांचेझ यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यांच्या जागी उपराष्ट्रपती नादिया कॅल्विनो सांतामारिया आणि परराष्ट्र मंत्री जोस मॅन्युएल अल्बेरेस या शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

# शिल्पाने पतीला दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा!



शिल्पा शेट्टीने पती राज कुंद्राला 48व्या वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर शुभेच्छा दिल्या आहेत. अभिनेत्रीने एक व्हिडिओ शेअर केला आहे आणि वाढदिवसाची नोटही लिहिली आहे. या व्हिडिओमध्ये राज कुंद्रा बऱ्याच दिवसांनी मास्कशिवाय दिसत आहे. या व्हिडिओमध्ये शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा जंगलातून जाताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये हरीणही दिसत आहेत. शिल्पा स्वत: हा व्हिडिओ रेकॉर्ड करत आहे आणि राजनेही कॅमेराकडे तोंड वळवण्याचा प्रयत्न केला आहे पण राज हरणाकडे पाहत आहे. व्हिडिओमध्ये काही वेळानंतर राज कॅमेऱ्याकडे तोंड करून दिसत आहे. खरेतर, पोर्नोग्राफी प्रकरणात नाव जोडले गेल्यानंतर राज कुंद्रा मास्क घातल्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी येत नव्हता. व्हिडीओ शेअर करताना शिल्पाने लिहिले आहे की, यावर्षी राजच्या वाढदिवशी ती त्याला आरसा गिफ्ट करणार आहे कारण त्याला ती रोज काय पाहते ते दाखवायचे आहे. तिने पुढे लिहिले की, राज खूप मजेदार आणि दयाळू आहे. याशिवाय तो खूप चांगला माणूस आहे. जोडीदार म्हणून परफेक्ट असल्याचेही शिल्पाने सांगितले. पॉर्नोग्राफी प्रकरणात नाव जोडल्यानंतर मला यावर चित्रपट बनवायचा असल्याचे अलीकडेच राज कुंद्राने सांगितले होते. 2021 मध्ये या प्रकरणात अटक झाल्यानंतर राज कुंद्राने सुमारे 63 दिवस तुरुंगात काढले. या प्रकरणाशी नाव जोडले गेल्यानंतर त्याच्या आयुष्यात किती गडबड झाली हे चित्रपटाच्या माध्यमातून मला सांगायचे होते, असे राज कुंद्रा म्हणाला होता. शिल्पा शेट्टीने 2009 मध्ये राज कुंद्राशी लग्न केले.

# सोनारीकावर गुन्हा दाखल !

काही दिवसांपुर्वी बालकलाकार साईशा भोईरची आई पूजा भोईला आर्थिक फसवणुक केली म्हणुन अटक करण्यात आली. आता आणखी एका अभिनेत्रीने एका व्यक्तीची फसवणुक केल्याचा आरोप करण्यात आलाय. ही अभिनेत्री म्हणजे सोनारीका भदोरिया.
सोनारीका भदोरिया हिने देवो के देव या लोकप्रिय टीव्ही मालिकेत अभिनय केलाय. सोनारीकाविरुद्ध आर्थिक फसवणुक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय. सोनारिका भदोरिया ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. सोनारिकाने आजवर अनेक हिंदी मालिकांमध्ये लोकप्रिय भुमिका साकारल्या आहेत. सोनारिका विरोधात माहिम येथील शाहू नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलीय. सोनारिका तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक जाहिरात ठेवली होती. त्या जाहीरातीत पैशांची गुंतवणुक करुन खुप पैसे कमवा, असं सांगण्यात आलं होतं ही जाहीरात पाहून परमेश मैत्री नामक व्यक्तिने पैशांची गुंतवणुक केली. परंतु नंतर आपली फसवणुक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. म्हणुन त्याने पोलिस ठाण्यात अभिनेत्रीविरोधात तक्रार करुन गुन्हा नोंदवला आहे.

# शिता दत्ता कामावर परतली



प्रसूतीनंतर जवळपास 50 दिवसांनंतर अभिनेत्री इशिता दत्ता पुन्हा एकदा कामावर परतली आहे. खुद्द इशिताने तिच्या सोशल मीडिया हँडलवरून ही माहिती दिली. वास्तविक, इशिताने 7 सप्टेंबर रोजी तिच्या सोशल मीडिया हँडलवर एक व्हिडिओ व्लॉग शेअर केला होता, ज्यामध्ये तिने सांगितले होते की आज ती खूप दिवसांनी पुन्हा एकदा सेटवर परतत आहे. अभिनेत्रीने व्हिडिओमध्ये तिचा मुलगा वायुची झलकही दाखवली. मात्र, व्हिडिओमध्ये वायुचा चेहरा दिसत नाही. लोकप्रिय व्लॉग इशिताच्या घरापासून सुरू होतो. अभिनेत्री सांगते की आज ती खूप दिवसांनी पुन्हा एकदा सेटवर जात आहे. यानंतर, व्हिडीओमध्ये इशिता वायूला आपल्या मांडीवर घेतलेली दिसत आहे, ती म्हणते की शूटिंग दरम्यान तिला खूप मिस होईल. मात्र, सेटचे लोकेशन तिच्या घरापासून अगदी जवळ असल्याने ती शूटला सहज जाऊ शकते, असे तिचे म्हणणे आहे. काही वेळ प्रवास केल्यानंतर इशिता सेटवर पोहोचते. मेकअप आणि आउटफिट स्टाइल केल्यानंतर, इशिताने तिच्या सेटची एक झलकही शेअर केली. अभिनेत्री तिथे उपस्थित असलेल्या क्रूची ओळख करून देते. सेटवरून परतल्यानंतर इशिता तिचा मुलगा आणि पती वत्सल सेठसोबत मंदिरात जाते. अभिनेत्री तिथे जाऊन प्रार्थना करते आणि आपल्या मुलाला आशीर्वाद देते. व्लॉगमध्ये अभिनेत्रीने सांगितले की, हॉस्पिटलमधून आल्यानंतर ती पहिल्यांदा वायुला बाहेर घेऊन जात आहे. मंदिरानंतर, इशिता पहिल्यांदा वायुला तिच्या आजोबांच्या घरी घेऊन जाते. जिथे सर्वजण नव्याने जन्मलेल्या बाळासोबत वेळ घालवतात. अभिनेत्री सांगते की आज पहिल्यांदाच तिच्या भाचीने तिच्यासाठी चहा बनवला, जे पाहून ती खूप खुश झाली. सोशल मीडियावर अभिनेत्रीचा हा व्हिडीओ चाहत्यांना चांगलाच आवडला आहे. पुन्हा कामावर परतल्याबद्दल लोक तिचे अभिनंदन करत आहेत. इशिता आणि वत्सल सेठ यांचा विवाह 28 नोव्हेंबर 2017 रोजी झाला होता. लग्नाच्या 6 वर्षांनंतर हे जोडपे पालक बनले आहे. दोघेही आज त्यांचे पालकत्व एन्जॉय करत आहेत.

# वंदना गुप्तेंचा नवीन सिनेमा

वंदना गुप्तेंचा बाईपण भारी देवा प्रचंड गाजला. बाईपण भारी देवा हा सैराटनंतर सर्वाधिक कमाई करणारा मराठी सिनेमा ठरला. बाईपण भारी देवा सिनेमात वंदना गुप्तेंनी साकारलेली शशीची भुमिका चांगलीच गाजली. आता बाईपण भारी देवा नंतर वंदना गुप्ते नवीन सिनेमातुन भेटीला येत आहेत. हा सिनेमा म्हणजे रावण कॉलिंग. विशेष गोष्ट म्हणजे अभिनेते मिलिंद गुणाजी आणि अभिनेत्री राणी गुणाजी यांचा मुलगा अभिषेक गुणाजी या सिनेमाच्या माध्यमातुन दिग्दर्शनात पदार्पण करणार आहे. 'रावण कॉलिंग' या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा नुकताच पार पडला. यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरेंचा मुलगा अमित राज ठाकरे यांनी सिनेमाच्या मुहूर्ताचा पहिला क्लॅप दिला. संदीप दंडवते, संदीप बंकेश्वर आणि अभिषेक गुणाजी यांची सिनेमाला पटकथा आहे. तर अभिषेक गुणाजी आणि संदीप बंकेश्वर यांनी रावण कॉलिंग सिनेमाचं दिग्दर्शन केलंय.. 'रावण कॉलिंग'मध्ये सचित पाटील, पूजा सावंत, वंदना गुप्ते, गौरव घाटणेकर, रवी काळे, बिपीन नाडकर्णी राजू शिसाटकर आणि सोनाली कुलकर्णी, मिलिंद गुणाजी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सध्या तरी हा चित्रपट कशावर आधारित आहे, याबाबत गोपनीयता असली तरी लवकरच या गोष्टी उलगडतील.



# मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले : अंकिता लोखंडे

अभिनेत्री अंकिता लोखंडेने अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते. हे सर्व पाहून मला असे वाटते की त्यांना काही काम नाही.

# गॉफ अमेरिकन टेनिसची नवी स्टार!

## » गॉफ व सबालेंका महिला एकेरीच्या फायनलमध्ये भिडणार

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**कोको गॉफ आणि आर्यना सबालेंका यांनी आंदोलकांच्या प्रदीर्घ विलंबानंतर यूएस ओपनमध्ये उपांत्य फेरीत प्रवेश केला. दोघीही त्यांच्या कारकीर्दीतील दुसरी ग्रँडस्लॅम फायनल खेळणार आहेत, तर त्या प्रथमच यूएस ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचल्या आहेत.**

अलीकडच्या काळात दोन्ही खेळाडूंच्या कामगिरीत सुधारणा झाली. १९ वर्षीय गॉफने इतरांपेक्षा वेगाने आपल्या खेळात वेगाने सुधारणा केली आहे. जुलैच्या सुरुवातीला ती नवख्या खेळाडूसारखी खेळत होती, पण सप्टेंबरमध्ये ती यूएस ओपनची फायनल खेळणार आहे. देशांतर्गत ग्रँडस्लॅममध्ये ती आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिली आहे आणि अमेरिकेतील या खेळाची नवा चेहरा म्हणून पुढे येत आहे. दक्षिण फ्लोरिडाच्या गॉफने आर्थर ॲशे स्टेडियमवर झेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुकोवाचा ६-४, ७-५ असा पराभव केला.

गुरुवारी उष्ण आणि थंड रात्री गॉफची परीक्षा झाली. तिने मुकोवाच्या ऑल कोर्ट गेमचा सामना करावा लागला. मात्र घरच्या चाहत्यांच्या प्रचंड पाठिंब्याच्या जोरावर गॉफने २ तास ३ मिनिटांत सामना जिंकला. गॉफ जिंकल्यास २०१७ नंतर पहिल्यांदाच देशांतर्गत खेळाडू यूएस ओपन महिला एकेरीचे विजेतेपद जिंकेल. हे त्याचे पहिले ग्रँडस्लॅम विजेतेपद असेल. अंतिम फेरीत गॉफचा सामना बेलारूसच्या सबालेंकाशी होणार आहे. साबालेंका पुढील आठवड्यात येणाऱ्या नवीन क्रमवारीत नंबर-१ खेळाडू बनेल. तिने अमेरिकेच्या मॅडिसन कीजचा ३ सेटच्या चुरशीच्या लढतीत पराभव केला. तिने ०-६, ७-६, ७-६ असा विजय मिळवला. अमेरिकन वेळेनुसार पहाटे १ वाजता ती जिंकली. जिंकल्यास सबालेंकाचे दुसरे ग्रँडस्लॅम ठरले. मुकोवाविरुद्धच्या सामन्यावर गॉफने वर्चस्व राखले, परंतु पर्यावरण समर्थक विरोधकांमुळे सामना दुसऱ्या सेटमध्ये लवकर थांबवावा लागला. जवळपास ५० मिनिटे सामना थांबला. एक आंदोलक त्याच्या पायाला चिकट पदार्थ लावत होता, जेणेकरून तो कोर्टाला चिकटेल. आंदोलकांना हटवण्यासाठी न्यूयॉर्क पोलिस विभाग व सुरक्षा अधिकाऱ्यांना संघर्ष करावा लागला. सामना थांबल्यानंतर गॉफ, मुकोवा कोर्टातून बाहेर पडल्या, लॉकर रूम जवळ थांबल्या.



### नवीन क्रमवारीत नंबर-1 खेळाडू बनेल

» दक्षिण फ्लोरिडाच्या गॉफने आर्थर ॲशे स्टेडियमवर झेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुकोवाचा ६-४, ७-५ असा पराभव केला. गुरुवारी उष्ण आणि थंड रात्री गॉफची परीक्षा झाली. तिने मुकोवाच्या ऑल कोर्ट गेमचा सामना करावा लागला. मात्र घरच्या चाहत्यांच्या प्रचंड पाठिंब्याच्या जोरावर गॉफने २ तास ३ मिनिटांत सामना जिंकला. गॉफ जिंकल्यास २०१७ नंतर पहिल्यांदाच देशांतर्गत खेळाडू यूएस ओपन महिला एकेरीचे विजेतेपद जिंकेल. हे त्याचे पहिले ग्रँडस्लॅम विजेतेपद असेल. अंतिम फेरीत गॉफचा सामना बेलारूसच्या सबालेंकाशी होणार आहे. साबालेंका पुढील आठवड्यात येणाऱ्या नवीन क्रमवारीत नंबर-१ खेळाडू बनेल. तिने अमेरिकेच्या मॅडिसन कीजचा ३ सेटच्या चुरशीच्या लढतीत पराभव केला. तिने ०-६, ७-६, ७-६ असा विजय मिळवला. अमेरिकन वेळेनुसार पहाटे १ वाजता ती जिंकली. जिंकल्यास सबालेंकाचे दुसरे ग्रँडस्लॅम ठरले

# पाकिस्तान विरोधात भारताचा जबरदस्त प्लॅन!

## » भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्यामध्ये शाहीन आफ्रिदीची भीती

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया चषक २०२३चा सुपर-४ सामना १० सप्टेंबर रोजी कोलंबो येथे खेळवला जाईल. पण त्याआधी पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदीविरुद्ध कसे खेळावे, यासाठी भारतीय फलंदाज नेटमध्ये कसून सराव करत आहेत. पहिल्या सामन्यात पाकिस्तानविरुद्ध भारतीय संघाची आघाडीची फळी कोसळली. शाहीन आफ्रिदीने रोहित शर्मा, विराट कोहली, हार्दिक पांड्या आणि रवींद्र जडेजासारख्या खेळाडूंना बाद करत एक दबदबा निर्माण केला. पाकिस्तानच्या गोलंदाजीचा सामना कसा करावा? यावर टीम इंडियाने एक योजना आखली असून त्यावर तोडगा काढला आहे.**




आफ्रिदीच्या स्विंग आणि वेगाचा सामना करण्यासाठी भारतीय फलंदाज विशेष कसरत आणि रणनीती वापरून सराव करत आहेत.

रोहित आणि विराटची उणीव भासणारी टीम इंडिया, महत्त्वाच्या सामन्यापूर्वी पहिल्या नेट सत्रात डाव्या हाताच्या गोलंदाजाचा सामना करण्यासाठी एक योजना आखताना दिसली.

त्या दोघांनी १५०च्या स्पीडने येणाऱ्या चेंडूचा कसा सामना करावा यावर जोर दिला. या दरम्यान भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या तिन्ही गोलंदाजांनी कशाप्रकारे विकेट्स घेतल्या याचे व्हिडीओ पाहिले आणि त्यावरून रणनीती आखली. टीम इंडियाच्या या सराव सत्रात के.एल. राहुल, शुबमन गिल आणि श्रेयस अय्यर यांच्यासह अनेक फलंदाजांनी जबाबदारी पार पाडत नेटमध्ये जोरदार सराव केला. पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या सामन्यात झगडणारा गिल त्याच्या फलंदाजीकडे अधिक लक्ष देतोय. दरम्यान, सराव सत्रामध्ये मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांनी फलंदाजांवर लक्ष ठेवले. हे दोघेही संपूर्ण सत्रात फलंदाजांच्या संपर्कात राहिले.

हारिस रौफ आणि नसीम शाह यांनीही टीम इंडियाविरुद्ध यश मिळवले आहे, दुसरीकडे डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी टीम इंडियासाठी नेहमीच मोठे आव्हान ठरला आहे. युवा वेगवान गोलंदाजांविरुद्ध बाद होण्याच्या बाबतीत रोहित शर्मा, के.एल. राहुल आणि विराट कोहली आतापर्यंत दुसऱ्या क्रमांकावर आहेत. आफ्रिदीने भारताविरुद्ध आतापर्यंत ४ सामन्यात १९.२५च्या सरासरीने ७ विकेट्स घेतल्या आहेत. शाहीन आफ्रिदीने २०२२ टी२० विश्वचषकादरम्यान भारताची फलंदाजी उद्ध्वस्त करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

यादरम्यान त्याने के.एल. राहुल, रोहित शर्मा आणि विराट कोहलीला बाद करून पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले. वेगवान गोलंदाजाच्या शानदार स्पेलमुळे पाकिस्तानने भारताविरुद्धचा पहिला विश्वचषक २०२१ साली जिंकला. यावेळी कोणता संघ वन डे विश्वचषक जिंकणार याचे भाकीत कोणीच करू शकत नाही. टीम इंडियाचा वर्ल्डकपमधील पाकिस्तान विरुद्धचा सामना हा १४ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

### भारतीय खेळाडूंनी आखली रणनीती

» पाकिस्तानच्या गोलंदाजीचा सामना कसा करावा? यावर टीम इंडियाने एक योजना आखली असून त्यावर तोडगा काढला आहे. आफ्रिदीच्या स्विंग आणि वेगाचा सामना करण्यासाठी भारतीय फलंदाज विशेष कसरत आणि रणनीती वापरून सराव करत आहेत. रोहित आणि विराटची उणीव भासणारी टीम इंडिया, महत्त्वाच्या सामन्यापूर्वी पहिल्या नेट सत्रात डाव्या हाताच्या गोलंदाजाचा सामना करण्यासाठी एक योजना आखताना दिसली. त्या दोघांनी १५०च्या स्पीडने येणाऱ्या चेंडूचा कसा सामना करावा यावर जोर दिला. या दरम्यान भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या तिन्ही गोलंदाजांनी कशाप्रकारे विकेट्स घेतल्या याचे व्हिडीओ पाहिले आणि त्यावरून रणनीती आखली.